# कक्ष ११, गु.प्र.शा., गु.अ.वि. कांदिवली (प), मुंबई,

.............................................................................................................

**-: प्रेस नोट :-** **दिनांक - २१/०८/२०२६**

**<u>हेरॉईन या अंमली पदार्थाची तस्करी/विक्री करणा-या आरोपतींना अटक करण्यात आलेबाबत.</u>**

| | | |
|---|---|---|
| **गु.र.क्र. व कलम** | :- | गु.प्र.शा., गु.अ.वि., गु.र.क्र. ११०/२०२६, कलम ८ (क) सह २१ (क), २९ एन. डी. पी. एस. कायदा १९८५ (कांदिवली पो. ठाणे, गु.र.क्र. ११३३/२०२६) |
| **दाखल दिनांक** | :- | दिनांक २१/०८/२०२६ रोजी |
| **गुन्हयाचे घटनास्थळ** | :- | खजुरीया रोड, बी.एम.सी. गार्डनजवळ, कांदिवली (प.) मुंबई |
| **आरोपीची संख्या** | :- | ०२ |
| **जप्त मुद्देमाल व अंदाजे किंमत** | :- | १) एकूण ६५१ ग्रॅम वजनाचे हेरॉईन, अं.किं.रु. ३,२५,५०,०००/-<br>२) रोख रक्कम २,१०,०००/- रू.<br>३) दोन मोबाईल फोन व इतर साहित्य किं. ५०,४००/- रू.<br>**एकुण जप्त मुद्देमाल कि. ३,२८,१०,४००/- रू.** |

मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई सो. यांचे आदेशान्वये मुंबई व मुंबई उपनगरामध्ये अंमली पदार्थाची तस्करी तसेच खरेदी विक्री करणाऱ्या इसमांचा शोध घेवुन त्यांच्याविरुध्द कडक कारवाई करण्यासाठी कक्ष ११, गु.प्र.शा., गु.अ.वि. कांदिवली (प), मुंबई यांचेकडुन विशेष मोहिम हाती घेण्यात आली आहे.

दिनांक २०/०८/२०२६ रोजी कक्ष ११, गु.प्र.शा., गु.अ.वि. कांदिवली (प), मुंबई येथे प्राप्त झालेल्या खबरीवरुन पोलीस पथकाने तात्काळ व प्रभावीपणे कारवाई करुन कांदिवली पश्चिम, मुंबई परिसरात सापळा रचून दोन इसमांना ताब्यात घेवून त्यांच्याकडून **एकूण ६५१ ग्रॅम वजनाचे ''हेरॉईन'', अं.किं.रु. ३,२५,५०,०००**/- किंमतीचा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला. सदर प्रकरणामध्ये गु.प्र.शा., गु.अ.वि., गु.र.क्र. ११०/२०२६, कलम ८ (क) सह २१ (क),२९ एन.डी.पी.एस.कायदा १९८५ (कांदिवली पो.ठाणे, गु.र.क्र. ११३३/२०२६) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून नमूद आरोपीतांना हेरॉईन हा अंमली पदार्थाची तस्करी केली, जवळ बाळगला म्हणून सदर गुन्हयात अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयात हेरॉईन तस्करी करणा-या परराज्यातील टोळीचा सहभाग दिसून येत असून त्यान्वये पुढील तपास करण्यात येत आहे.

सदरची यशस्वी कामगिरी ही मा. श्री. देवेन भारती, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मा.श्री.अनिल कुंभारे, पोलीस सह आयुक्त(गुन्हे), मा.श्री. कृष्णकांत उपाध्याय, अपर पोलीस आयुक्त(गुन्हे), मा. श्री नवनाथ ढवळे, पोलीस उप आयुक्त, प्रकटीकरण १, गुन्हे शाखा, मुंबई व मा. श्री. दिनकर शिलवटे, सहाय्यक पोलीस आयुक्त, डी दक्षीण, गुन्हे शाखा, मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली कक्ष ११, गु.प्र.शा., गु.अ.वि. कांदिवली (प), मुंबई येथील वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. शशिकांत जगदाळे, पो.नि. विश्वास पाटील, स.पो.नि. दादासाहेब बनसोडे, स.पो.नि. अमित पाटील, पो.उ.नि. बाळासाहेब शिंदे व पथक यांनी केली आहे.

----०००----